# कार्यावली

## सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता नागपूर येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे.

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**पाच** : सन २०१२-२०१३ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**सहा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ** : अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

**नऊ** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**दहा** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**तेरा** : **शासकीय विधेयके. (गत सत्रातील प्रलंबित)**

**विधानसभेने संमत केलेली खालील विधेयके विधानपरिषदेकडे प्रलंबित :-**

(१) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २० - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ "

(२) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७ "

(३) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ "

(४) “ सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ ”

(५) “ सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ ”

**चौदा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंधरा** : शोक प्रस्ताव.

**सोळा** : इतर प्रस्ताव.

**सतरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**एकोणीस** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ११ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे**

(२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक ११ - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(३) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ - **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १३ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(५) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(६) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(७) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(८) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १७ - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१४ -**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(९) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १८ - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(१०) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १९ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(११) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २० - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(१२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(१३) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २२ - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(१४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २३ - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

(१५) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.**

(१६) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.**

(१७) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक,२०१५ - **श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.**

(१८) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक,२०१५ - **श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.**

(१९) सन २०१६ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचे.**

(२०) सन २०१६ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.**

(२१) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, २०१७ - **श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.**

(२२) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक २ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचे.**

(२३) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१७ - **श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.**

(२४) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१७ - **श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.**

**वीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) :-**

**श्री. धनंजय मुंडे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३, ४ व ५**

(३) " महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात ३ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी दुर्दैवी आत्महत्या केलेल्या असणे, सततची नापिकी व दुष्काळ यासोबतच सातत्याने कोसळणारे शेतमालाचे बाजारभाव यामुळे शेतीची अर्थव्यवस्था पुर्णपणे कोलमडली असणे, सन २०१३-१४ मध्ये ४५ बिलीयन डॉलर्स एवढी असलेली कृषी आधारित उत्पादनांची निर्यात सन २०१६-२०१७ अखेर ३० बिलीयन डॉलर्स एवढी घसरणे, शासनाचे ग्राहकधार्जीणे व चुकीचे शेतमाल विपणन धोरण यामुळे गेल्या तीन वर्षात सातत्याने शेतमालाचे भाव कोसळले असून त्यामुळे शेती अर्थव्यवस्था व पर्यायाने शेतकरी प्रचंड अडचणीत आलेला असणे, त्यामुळे शेतमालाच्या निर्यातीवरील सर्व निर्बंध उठविण्याची व शेतमालाच्या निर्यातीस

प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असणे, तसेच स्वामीनाथन आयोगाची शिफारस तसेच या देशाचे मा.पंतप्रधान यांनी निवडणूक प्रचारादरम्यान राज्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा असा एकत्रित हमीभाव देण्याचे धोरण स्विकारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) "महाराष्ट्र राज्याच्या वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यासह काही भागात दारुबंदी लागू करण्यात आलेली असणे, गुजरात, बिहार, उडीसासह अनेक राज्यांमध्ये संपूर्ण दारुबंदी लागू असणे, याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात संपूर्ण दारुबंदी करण्याबाबत सातत्याने मागणी होत असणे, अनेक महिला संघटनांनी गाव, तालुका व जिल्हा पातळीवर आंदोलने करुन दारुबंदीची मागणी केलेली असणे, या मागणीची तीव्रता दिवसेंदिवस वाढणे, दारुमुळे लाखो कुटुंबे उद्ध्वस्त होत असून सामाजिक स्वास्थासाठी हा फार मोठा धोका असून माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुक काळात नगर जिल्ह्याच्या जेऊर गटातील पांगरमल गावात विषारी दारुमुळे अकरा जणांचा बळी गेलेला असणे, सन २०१५ मध्ये मुंबईतल्या मालाड-मालवणी भागात विषारी दारुमुळे १०४ जणांना प्राण गमवावे लागणे, सन २००४ मध्ये मुंबईतील विक्रोळी भागात शंभरहून अधिक जण विषारी दारुमुळे मृत्युमुखी पडणे, दारु पिऊन वाहन चालवल्यामुळे होणाऱ्या अपघातात वाहनचालकासह निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागत असणे, युवकांमध्ये वाढलेले दारुचे व्यसन ही देखील गंभीर समस्या निर्माण झाली असणे, दारु ही नागरिकांसाठी, विशेषतः युवा पिढीसाठी विनाशकारी ठरत असणे, दारुमुळे उद्भवणाऱ्या समस्यांच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांप्रमाणे संपूर्ण राज्यात दारुबंदी लागू करण्यात यावी, तसेच यापूर्वी यासंदर्भात देण्यात आलेल्या अनुज्ञप्त्या व परवाने रद्द करण्यात यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५) "राज्यातील ऊसतोड कामगार वर्षातील ८ महिने ऊस तोडणीसाठी घराबाहेर राहत असणे, त्यामुळे त्यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांच्या स्थलांतराच्या ठिकाणी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरु करण्यात याव्यात तसेच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी शासकीय वसतीगृहात निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था करावी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. गिरीशचंद्र व्यास वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, २२, ३४ व ३९**

(६) “ राज्यात विशेषतः विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असून त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करून तेथे कोणताही उद्योग सुरू केलेला नसणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५७९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, बुटीबोरी नागपूर विभाग या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील सन १९९९ पासून नविन उद्योग येणे बंद होणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडाची एकूण ५३,५३६ चौ.मी. जागेची अतिरिक्त मागणी असणे, माहे एप्रिल २०११ ला प्रस्ताव पाठवून ही परवानगी न मिळणे, वर्धा एम.आय.डी.सी. तील ५० टक्के जागा उद्योजकांनी घेऊन ही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा गैरवापर केलेला असणे, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल न होणे, या सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरूपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२२) “ महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जात असणे, परंतु ह्या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होणे, त्यांची गैरसोय टाळण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी भवनाची उभारणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(३४) “ राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असण्याची आवश्यकता असणे, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही तसेच याबाबत आर्थिक भुर्दंडही सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(३९) “ राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी या दृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

**श्री. हेमंत टकले वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७, ८, ९, १० व ११**

(७) " राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी-सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्यावेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांचा मृत्यू होणे, अनेक जण गंभीर जखमी होणे, या घटना क्लेशदायक असल्याने आता यापुढे राज्यातील धार्मिक स्थळाच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्यादृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(८) " राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने खास कार्यक्रम आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(९) " राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरीक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(११) " राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जाणे, परिणामी तरूणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**श्री. जयवंतराव जाधव वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२, १३ व १४**

(१२) " महाराष्ट्र गुजरात सीमेवरील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील काही पाणी दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी-नर्मदा या नदी जोड प्रकल्पांद्वारे गुजरातला दिले जाणार असणे, मात्र महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील सर्वच्या सर्व पाणी महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला मिळण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३) " राज्यातील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडचणी येत असणे, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागत असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी शासनाने रु. १५,००० ही उत्पन्न मर्यादा ठरवलेली असणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे किमान रुपये ५०,००० उत्पन्न मर्यादा करण्याची गरज निर्माण झालेली असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी उत्पन्न मर्यादेबाबतचा निकष सुधारित करण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४) " महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कामकाज इंग्रजी भाषेत केले जात असणे, मात्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्याची आवश्यकता असल्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४८(२) मधील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल तटकरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १७, १८, १९, २० व २१**

(१७) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते,अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१८) " कोकणातील आंबा, काजू इत्यादी पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यात आलेली सर्वंकष पिक बिया योजना ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील आंबा, काजू इत्यादी फळपिकांना लागू करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) "कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता कोकणात रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करावा तसेच या रेल्वे मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची कायमस्वरूपी शेड उभारण्यात यावी, महिला प्रवाशांची होत असलेली गैरेसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२०) "नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशी नैसर्गिक आपत्ती असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२१) "कोकणातील भूभागांपैकी सुमारे ५३.४५ टक्के पडीत असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इत्यादी फळांची लागवड आणि साग, शिसम, ऐन, किंजळ, खैर इत्यादी वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्यादृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. किरण पावसकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २३, २४, २५, २६ व २७**

(२३) "कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व पालघर या पाच जिल्ह्यांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करून त्यात मत्स्य व्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२४) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२५) "राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरू करणे, सदरची उपचार केंद्रे सुरू झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी,

स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांचे वेळीच उपचार होतील, म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२६) "राज्यात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करणे, यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२७) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वंयरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**प्रा. अनिल सोले वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २८ व ३७**

(२८) "राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदूषणाची समस्या निर्माण झालेली असणे, कोळसाखाणी पासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योजक त्यात थर्मल पॉवर स्टेशन, एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल, या पासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करूनही देखील नियम पाळत नसणे, विशेषतः ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवाचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवाचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधनसामुग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरीता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, याकरीता शासनाने विशेषयंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३७) "राज्यात विशेषतः विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असणे, त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करून तेथे कोणताही उद्योग सुरू केलेला नसणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, बुटीबोरी नागपूर विभाग या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नविन उद्योग येण्याचे बंद झाले असणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडांची एकूण ५३,५३६ चौ.मी. जागेची अतिरिक्त मागणी माहे एप्रिल, २०११ ला प्रस्ताव पाठवूनही परवानगी

मिळाली नसणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागा उद्योजकांनी घेऊनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा गैरवापर केलेला असणे, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल झालेला नसल्याने या सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरूपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२, ३३ व ३६**

(३१) "राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३२) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने खास कार्यक्रम आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३३) "राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक व प्रभावी होण्यासाठी व भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे एकाच मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३६) "राज्यात सातत्याने वाढणारी लोकसंख्या त्याप्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, होणारे दररोजचे अपघात, त्यामुळे होणारी जिवितहानी हे टाळण्यासाठी राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**ॲड. जयदेव गायकवाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४१, ४२, ४३ व ४४**

(४१) "राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जाणे, परिणामी तरूण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४२) " शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाणे, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४३) " राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवारा करीत असलेल्या हजारो अल्पवयीन विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण,सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४४) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**श्री. आनंद ठाकूर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४५, ४६, ४७ व ४८**

(४५) " राज्यात ४१७ ठिकाणी सरकारी आयटीआय उपलब्ध असून तेथे १७८ एवढेच कोर्सेस चालविले जात असणे, मात्र त्यातील अनेक कोर्सेस हे कालबाह्य झालेले असणे, विविध क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आले असतानाही जुन्याच तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षण दिले जात असणे, आयटीआय प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नवीन कोर्सेसची भर पडण्यासाठी गरजेनुसार नवीन कोर्सेस सुरू करण्याची आवश्यकता असणे, यासाठी राज्य शासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(४६) " पालघर जिल्ह्यात तसेच डहाणू, जव्हार या भागात इयत्ता १२ वी नंतर पदवी, पदव्यूत्तर शिक्षणाची सोय नसल्यामुळे विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठी होत असलेली परवड, ज्या विद्यार्थ्यांना मेडीकल, इंजिनिअरिंग, लॉ,आयटीआयसाठी प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांना पालघर, मुंबई या ठिकाणी जावे लागणे, परिणामी स्थानिक विद्यार्थ्यांचे होणारे हाल विचारात घेता, उक्त तालुक्यातील विद्यार्थ्यांची परवड थांबविण्यासाठी या ठिकाणी उच्च महाविद्यालय, इंजिनिअरींग, फार्मसी, नर्सिंग, सर्वेअर, वैद्यकीय, कायदे या क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण महाविद्यालये निर्माण होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४७) " पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड, वाडा, तलासरी, डहाणू, पालघर आणि वसई या बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४८) " पालघर जिल्हा हा आदिवासी असल्याने जिल्ह्यातील आदिवासींचा विकास साधण्याच्या दृष्टीने डहाणू, कासा, जव्हार, मोखाडा, नाशिक या रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळाच्या धर्तीवर एक स्वायत्त रेल्वे महामंडळ स्थापन करून हा रेल्वे मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. रामराव वडकुते वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४९, ५०, ५१ व ५२**

(४९) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते,अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५०) " राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नसल्याने देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५१) " दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,०००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५२) " राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. नरेंद्र पाटील वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५४, ५५, ५६, ५७ व ५८**

(५४) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) " सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंध बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटून समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या तीनही जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५६) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वंयरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५७) " राज्यात व विशेषतः पुणे शहरातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत चाललेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून या वस्तूंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करून जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५८) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात येणे, या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य होणे, त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर

होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदुषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**ॲड. राहुल नार्वेकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५९, ६१ व ६२**

(५९) "ठाणे पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या विचारात घेता त्यांना शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला यावे लागणे, तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या, डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६१) "राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक तसेच आदिवासी आश्रम शाळांमधील शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा, अनेक शाळांमध्ये अपूरे शिक्षक वर्ग, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडांगणे, प्रयोग शाळा, संगणक, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता असणे, याप्रकरणी अमुलाग्र सुधारणा करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६२) "महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना स्पर्शून जाणे, सदर जिल्ह्यातील जनतेचे मासेमारी हे पारंपारीक प्रमुख उत्पन्नाचे व जीविताचे साधन असताना राज्यशासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे, या जिल्ह्यांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली असणे, त्या शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सतिश चव्हाण वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६४, ६५ व ६६**

(६४) "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६५) " राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा संर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका स्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६६) " राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था, विशेषतः मराठवाड्यातील शाळांच्या इमारती पडक्या झालेल्या असुन विद्यार्थ्यांना बसण्याजोग्या नसणे, तसेच शाळांची कंपाउंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हापरिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. अपूर्व हिरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६७, ६८, ६९, ७० व ७१**

(६७) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहीरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब, त्यामुळे पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात घेतल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्यादृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारास ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६८) " पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती, ही अतिशय गंभीर बाब झालेली असणे, त्यावर जल तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण होणे, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, महाराष्ट्रातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता असणे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन परिणामी, पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासकीय आस्थापनांना निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी इतर बाबी तपासण्यात येतात त्याचप्रमाणे (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याच्या नियोजनाबाबत केलेली तरतूद तपासूनच बांधकाम परवाना द्यावा याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाने सूचना निर्गमित कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६९) " नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या

जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७०) "राज्यात ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडणे, व्यवस्थापन नीट होत नसल्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७१) "राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. ख्वाजा बेग वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७२, ७३, ७४ व ७६**

(७२) "पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई, परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती, ही अतिशय गंभीर बाब झालेली असणे, त्यावर जलतज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, महाराष्ट्रातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता असणे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासकीय आस्थापनांना निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात तसेच (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे तपासूनच बांधकाम परवाना द्यावा अशी सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाने निर्गमित कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७३) विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित रहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा

काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७४) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७६) "विदर्भातील निम्न पैनगंगा, बेंबळा प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अमरसिंह पंडित वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७७, ७८, ८० व ८१**

(७७) "राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे व दुरुस्ती करुन ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीयोग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७८) "राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारी भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरु करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८०) "राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८१) " राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहिर करणे, त्यानुसार नगर पंचायती व पालिकांची निर्मिती होणे, यामुळे नगर पालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगर पालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. नागोराव गाणार वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८२, ८३, ८४, ८५ व ८६**

(८२) " राज्यातील मुलांना सुदृढ व समृद्ध बनविण्याच्या दृष्टीकोनातून शाळेतील मुलांसाठी राबविण्यात येणारी मध्यान्ह शालेय पोषण आहार योजना संबंधित शाळेकडून कार्यान्वित करण्यात येत असणे, त्यामुळे शाळेतील सर्व शिक्षकांना या योजनेवर लक्ष केंद्रित करावे लागणे, शालेय पोषण आहार योजनेसंबंधी आठवड्यातून दोन वेळा बैठकीचे आयोजन करण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवावयाच्या विषयाकडे दुर्लक्ष होणे, या सर्वांचा परिणाम अध्यापन प्रक्रियेवर होणे, या योजनेसाठी मानधन नियमित स्वरुपात मिळत नसणे, त्यामुळे मदतनीसांना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागणे, शालेय पोषण आहाराच्या विविध तक्रारी येत असल्यामुळे शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यावर कारण नसताना गंभीर गुन्ह्यांची नोंद होणे, यातून शिक्षकांना प्रचंड अशा मानसिक तणावाला सामोरे जावे लागणे, त्यामुळे शाळेतील मुलांसाठी राबविण्यात येणारा मध्यान्ह शालेय पोषण आहार हवाबंद डब्यातून ग्रामीण भागातील मुलांना स्वतंत्र यंत्रणेमार्फत पुरविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८३) " महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जाणे, परंतु या विद्यार्थ्यांना जिल्ह्यांच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, त्यांची गैरसोय टाळण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात शासनातर्फे विद्यार्थी भवनाची उभारणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८४) " राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८५) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक स्पर्धापरीक्षा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८६) " राज्यात ४१७ ठिकाणी सरकारी आयटीआय उपलब्ध असून तेथे १७८ एवढेच कोर्सेस चालविले जात असणे, मात्र त्यातील अनेक कोर्सेस हे कालबाह्य झालेले असणे, विविध क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान आले असतानाही जुन्याच तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण दिले जात असणे, आयटीआय प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करुन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भर पडण्यासाठी गरजेनुसार अत्याधुनिक नवीन कोर्सेस राज्य शासनाने सुरु करण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८७, ८८ व ८९**

(८७) " राज्यात विशेषतः ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनार पट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटत असल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यातील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८८) " राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विना विलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८९) " राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विभाग आणि महिला व बाल कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या विद्यार्थांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्याने त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासावर विपरीत परिणाम होत असल्याने या सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९१, ९३ व ९४**

(९१) " महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हा स्तरीय वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जाणे, परंतु ह्या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नसणे, त्यामुळे या विद्यार्थ्यांवर अन्याय होणे, त्यांची गैरसोय टाळण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यात शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी भवन बांधण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९३) " दादर, मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी येथे स्मारक असणे, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते, आताही राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तू ठेवण्यात आल्या असणे, दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी असणे, ही अद्यापही मान्य न झाल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, अतः दादर रेल्वेस्थानकाला " डॉ.बाबासाहेब आंबेडकर " रेल्वे स्थानक असे नाव द्यावे, अशी मागणी केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९४) " महाराष्ट्र राज्य हे प्रगतीशील राज्य असून राज्यातील शेतकरी व शेतमजूर उत्पादन वाढवून मेहनतीने व कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करून राज्याच्या विकासात हातभार लावणे, परंतु राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढलेले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन जगणे कठीण झाले असल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना किमान रू. २००० प्रति महिना पेन्शन देण्याची योजना सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९५ व ९७**

(९५) " चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी लागू करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, या निर्णयाची जनमानसांत उमटलेली समाधानांची भावना, दारू सारख्या व्यसनामुळे व्यसनाधीन व्यक्तींचे उध्वस्त झालेले संसार, या व्यसनामुळे तरुण पिढी वाममार्गाला जात असल्याचे दिसून येणे, त्यांना त्यापासून परावृत्त करणे अशक्य असल्याचेही दिसून येणे, त्यामुळे या पिढीचे भवितव्य अंधःकारमय होणे, यावर उपाय म्हणून संपूर्ण राज्यात दारूबंदी धोरण अंमलात आणावे, अशी समाजाच्या विविध स्तरातून होत असलेली मागणी, या बाबी विचारात घेता संपूर्ण राज्यात दारूबंदी धोरण राबविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९७) " राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपुरी व कालबाह्य झालेली असणे, शहरांतील भागात साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढिगांमुळे अनेक भागात रोगराई पसरून नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरून नागरिकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरिकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासनस्तरावरून यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासनस्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १००, १०१, १०२, १०३ व १०४**

(१००) " राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहीर करणे, त्यानुसार नगरपंचायती व नगरपालिकांची निर्मिती होणे, त्यामुळे नगरपालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगरपालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी विभागीय स्तरावर नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०१) " राज्यातील खेळाडुंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांवर अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०२) " राज्यात विशेषतः ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटून समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांतील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०३) “ राज्यात ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळपाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद पडणे, व्यवस्थापन नीट होत नसल्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१०४) “ राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १०५, १०६ व १०८**

(१०५) “ राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अल्प प्रमाण लक्षात घेता, हे प्रमाण अधिकरित्या वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पध्दतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१०६) “ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१०८) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिंना रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरू करावा, तसेच रोजगारासाठी भाग भांडवलाची सोय करावी त्याचप्रमाणे निवडणूक, जनगणना विषयक कामे शिक्षकांना देण्याऐवजी सुशिक्षित बेरोजगारांना देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

**श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११०**

(११०) " केंद्र सरकारचे हवामान खाते आणि त्यांच्या वेधशाळा नैऋत्य मान्सून पावसाचा अंदाज वर्तविण्याचे काम करणे, मान्सून पाऊस सुरू होण्याच्या अगोदर हवामान खात्याने आधी तारखा जाहीर करणे, मान्सूनचा पाऊस त्या तारखांना राज्यात सुरू न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीची वेळ येणे, मुंबईतील हवामान खात्याने पाऊस पडण्याची दिलेली तारीख आणि पुणे वेधशाळेने दिलेल्या तारखेत फरक असणे, पाऊस आणि इतर हवामानाचा विकसित देशात देण्यात येणारा अचूक अंदाजामागे त्यासाठी वापरण्यात येणारे आधुनिक तंत्रज्ञान हे कारण असणे, हवामानाचा अचूक अंदाज शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्य शासनाने आधुनिक तंत्रज्ञान वापरून परिपूर्ण विस्तारित व्यवस्था निर्माण करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्रीमती हुस्नबानू खलिफ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११३**

(११३) " राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्यांना (राजापूर, गणपतीपुळे, गुहागर, चिपळूण, दापोली) पर्यटन स्थळ म्हणून शासन मान्यता मिळण्याकरिता त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन तेथील सुशिक्षित बेरोजगारांना पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करण्यासाठी सर्व पर्यटक स्थळांचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ११७, ११८, ११९ व १२०**

(११७) " राज्यात वेळोवेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणाऱ्या पाण्याचे न्याय वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके, त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा व लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासनस्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(११८) " सध्या अस्तित्वात असलेल्या ठाणे जिल्ह्यात कल्याणासह सात तालुके असणे, कल्याण तालुका हा मध्यवर्ती ठिकाण अतिशय वेगाने विकसित होत असणे, येथील नागरीकरण व लोकसंख्या वाढीचा वेगही सर्वाधिक असणे, नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांचा महसूल यंत्रणेवर प्रचंड ताण येत

असल्याने अनेक शासकीय योजनांचा नागरिकांना वेळेत लाभ मिळत नसणे, सद्यस्थितीतील ठाणे जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार पाहता जिल्ह्याच्या शेवटच्या नागरिकाला सुविधा पोहोचविणे प्रशासनाला अनेक प्रयत्नांती अशक्य होत असणे, शासकीय सुविधांचा नागरिकांना वेळेत लाभ मिळावा यासाठी विद्यमान ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून, कल्याण तालुक्यासह उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर तालुक्यांचा मिळून नवीन कल्याण जिल्हा निर्माण करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे "

(११९) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने, एम.आय.डी.सी.व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असणे, या कारखान्यांतील रसायन मिश्रित प्रदूषित सांडपाणी नदीपात्रात सोडण्यात येत असल्याने नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकणातील ठाणे जिल्हा व पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असणे, या नदीपात्रातील जीवसृष्टी नष्ट होत चालली असून या प्रदूषित पाण्याचा नागरिकांच्या आरोग्यावर व मच्छिमार बांधवांच्या जीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता, राज्यातील वाढत्या जलप्रदूषण समस्येवर उपाययोजना करून जलप्रदूषणाच्या समस्येला कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१२०) " मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वर वारंवार होत असलेल्या वाहतूक कोंडीने महामार्ग व्यवस्थापनाचे ढिसाळ व्यवस्थापन दिसून येणे, या महामार्गावरील वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी व वाहतूक नियमांचे पालन होते की नाही याच्या निरीक्षणासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा नसणे, तसेच या महामार्गावरील अपघातातील जखमींना महामार्गालगत एकही सरकारी रुग्णालय व ट्रामा केअर सुविधा उपलब्ध नसणे, परिणामी वेळेवर उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना प्राणास मुकावे लागले असणे, त्यामुळे सदरहू महामार्गावर तातडीने ट्रामा केअर सेंटर व सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२४ व १२६**

(१२४) " राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयीसुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांचा मृत्यू होणे, यामध्ये अनेकजण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१२६) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४८**

(१४८) " थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षण चळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या दोन समाज प्रबोधकांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**एकवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**बावीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरीत करण्यात येईल.)

विधान भवन,
नागपूर.
दिनांक : ६ डिसेंबर, २०१७.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शामुना–एचबी-१९३४-मविपना-१२-२०१७-६१० प्रती-पीए५*

# महाराष्ट्र विधानपरिषद
## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०१७
## कार्यावलीचे जोडपत्र (अशासकीय ठराव)

| | |
|---|---|
| १. | **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १** |
| | "राज्यात उत्पादित होणाऱ्या सोयाबीन, मुग, उडीद, तूर, हरभरा, गहू, ज्वारी, कापूस या शेतमालाला शासनातर्फे हमीभाव जाहीर केला जाणे, प्रत्यक्षात बाजारात व्यापारी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाइतका भाव न देता त्यांची लूट करीत असल्याचे वारंवार निदर्शनास येणे, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या कारणांमध्ये शेतीमालाला भाव मिळत नसल्याचेही एक प्रमुख कारण असणे, त्यामुळेच महाराष्ट्रा शेजारील मध्यप्रदेश सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभावापेक्षा कमी भाव मिळाल्यास त्या दोन्हीतील फरकाची रक्कम देणारी योजना जाहीर केली असणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही शेतकऱ्यांना हमीभाव व बाजारात मिळणारा भाव यातील फरकाची रक्कम देणारी योजना तात्काळ सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| २. | **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २** |
| | "राज्यातील विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण भागात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असणे, या कापसाच्या उत्पादनासाठी शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणावर उत्पादन खर्च करावा लागत असणे, शासनातर्फे हमीभावाने या कापसाची खरेदी केली जात असणे, मात्र शेतकऱ्यांना कापूस उत्पादनासाठी येणारा खर्च आणि प्रत्यक्षात मिळणारा हमीभाव यात मोठी तफावत असल्याने शेतकऱ्यांना नुकसानीस सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावावर अधिकाधिक बोनस देणे गरजेचे असणे, महाराष्ट्रा शेजारील गुजरात राज्याने यावर्षी कापसाला हमीभावावर ५०० रुपये अधिक बोनस जाहीर केलेला असणे, गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादीत केलेल्या कापसाला हमीभाव अधिक ५०० रुपये बोनस द्यावा. अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ३. | **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७५** |
| | "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या उस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ४. | **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९०** |
| | "शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या विधवांना घर, समाज, सरकारी प्रक्रिया, शेती आदी सर्वच आघाड्यांवर संघर्ष करावा लागणे, त्यातच पदोपदी अपमान, अवहेलना आणि वेळ प्रसंगी बहिष्काराला तोंड द्यावे लागणे, शेतकऱ्यांच्या विधवा या वारसा हक्क किंवा आत्महत्येनंतर असलेल्या अधिकाराबाबत |

| | |
|---|---|
| | अनभिज्ञ असणे, त्यांनी अधिकार मागितले की त्यांना कुटंब बहिष्कृतासारखी वागणूक मिळणे, त्यांच्या समोर मुलांच्या भविष्याचा प्रश्न उभा असणे, याकरिता आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विधवांवर होणारा अन्याय व बहिष्कार सारख्या घटनांना आळा घालण्याकरिता धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली जाणे गरजेचे असणे, तसेच कायदेशीर तरतुदींचे पुनरावलोकन करून आवश्यक बदल करून ठेवणे व पिडीत स्त्रियांसाठी समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ५. | **श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९९** |
| | "केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये देशातील विविध शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याचा जाहिर केलेला निर्णय, या योजनेंतर्गत निवड केलेल्या शहरांमध्ये शाश्वत पाणी पुरवठा, वीज पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, प्रभावी नागरी दळणवळण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, परवडणाऱ्या घरांची उपलब्धता, सक्षम माहिती तंत्रज्ञान, डिजिटलायझेशन यंत्रणा, ई- गव्हर्नन्स, शाश्वत पर्यावरण, महिला आणि बालकांची सुरक्षा, आरोग्य सुविधा, शिक्षण आदी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे निश्चित केलेले असणे, सदर स्मार्ट सिटी योजनेत राज्यातील पुणे व सोलापूर शहरांची माहे जानेवारी, २०१६ मध्ये झालेली निवड, त्यानंतर टप्प्या-टप्प्याने राज्यातील मुंबई, नाशिक, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद व पिंपरी-चिंचवड या शहरांची झालेली निवड, सदर शहरांसाठीचे तयार केलेले सुमारे तीस कोटी रुपयांहून जास्त खर्चाचे स्मार्ट सिटी प्रस्ताव विहित मुदतीत केंद्र शासनास सादर केलेले असणे, निवड झालेल्या स्मार्ट शहरांसाठी ५ वर्षांसाठी प्रतिवर्ष/प्रतिशहर केंद्र शासनाने रुपये १०० कोटी तर राज्य शासनाने प्रतिवर्ष/प्रतिशहर रुपये ५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करावयाचे असणे, मात्र राज्यातील काही शहरांची दिड वर्षापूर्वी पासून व तद्नंतर निवड झालेली असताना व रितसर प्रस्ताव सादर झालेले असताना अद्यापही निधीची उपलब्धता करण्यात आलेली नसणे, तसेच प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कोणतीही विशिष्ट अशी कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे सदर प्रकल्प राबविण्याकडे शासनाची दिसून येत असलेली उदासिनता, सदर महत्त्वाकांक्षी व नागरीकांच्या विकासाच्यादृष्टीने महत्वाचे असलेले प्रकल्प तातडीने राबविण्यासाठी प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्याचा नियमित आढावा घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबी विचारात घेता यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ६. | **श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १२३** |
| | "राज्यातील पोलिसांना २४ तासांहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढणे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात रहावे लागत असणे, शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था असणे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मूलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |

| | |
|---|---|
| ७. | **श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १२५** |
| | "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात गांभीर्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचिविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधापरिषद शासनास करीत आहे." |
| ८. | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १२९** |
| | "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ९. | **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३२** |
| | "मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या स्वतंत्र विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १०. | **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३३** |
| | "राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील आठ महिने घराबाहेर राहत असणे, त्यामुळे यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण कुटूंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुला - मुलींसाठी निवासी शाळा सुरु करण्याची आवश्यकता असणे, ऊस तोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणा-या मुलांसाठी शासकीय वसतीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| ११. | **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३४** |
| | "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टचांई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |

| | |
|---|---|
| १२. | **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३५** |
| | "राज्यातील महाराष्ट्र राज्य हे प्रगतशील राज्य असून राज्यातील शेतकरी व शेतमजूर उत्पादन वाढवून मेहनतीने व कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करून राज्याच्या विकासात हातभार लावणे, परंतू राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले असणे, त्यामुळे त्यांचे जीवन जगणे कठीण झाले असणे, म्हणून राज्यातील शेतक-यांना किमान रु.२०००/- प्रति महिना पेन्शन देण्याची योजना सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १३. | **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३६** |
| | "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १४. | **श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३७** |
| | "विदर्भातील हातमाग विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची होत असलेली आर्थिक दुरवस्था व ते जगत असलेले हलाखीचे जीवन यात सुधारणा होण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १५. | **श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३८** |
| | "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १६. | **श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३९** |
| | "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १७. | **श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४१** |
| | "राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| १८. | **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४२** |
| | "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |

| | |
|---|---|
| १९. | **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४३** |
| | “राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| २०. | **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४४** |
| | “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| २१. | **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४५** |
| | “राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगाराची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी नोंदणी केलेली असणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| २२. | **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४६** |
| | “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असणे, या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झालेले असणे, त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| २३. | **श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४७** |
| | “राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| २४. | **श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४९** |
| | “शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |

| | |
|---|---|
| २५. | **श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५०** |
| | "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| २६. | **श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५१** |
| | "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| २७. | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५३** |
| | "राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे एक लाख अंगणवाडयाची संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाडयाद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नसणे, वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही सहा वर्षापर्यंत होत असणे, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असल्याने यासाठी शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करुन विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| २८. | **श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५५** |
| | "राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपुरी व कालबाहय झालेली असणे, शहरांतील भागात साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढींगामुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरिकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरिकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासनस्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अमंलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| २९. | **श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५६** |
| | "केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये देशातील विविध शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याचा जाहिर केलेला निर्णय, या योंजनेतर्गत निवड केलेल्या शहरांमध्ये शाश्वत पाणी पुरवठा, वीज पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, प्रभावी नागरी दळणवळण सार्वजनिक वाहतुक व्यवस्था, परवडणाऱ्या घरांची उपलब्धता, सक्षम माहिती तंत्रज्ञान, डिजिटलायझेशन यंत्रणा, ई-गव्हर्नन्स, शाश्वत पर्यावरण, महिला आणि बालकांची सुरक्षा, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि पायाभुत सुविधा निर्माण करण्याचे निश्चित केलेले असणे, सदर स्मार्ट सिटी योजनेत राज्यातील पुणे व सोलापुर शहरांची माहे जानेवारी २०१६ मध्ये झालेली निवड, त्यानंतर टप्प्या-टप्प्यात राज्यातील मुंबई, नाशिक, नवी मुंबई, ठाणे, नागपुर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद व पिंपरी-चिचंवड या शहरांची झालेली निवड, सदर शहरांसाठीचे तयार केलेले सुमारे तीस |

| | |
|---|---|
| | कोटी रुपयांहून जास्त खर्चाचे स्मार्ट प्रस्ताव विहीत मुदतीत केंद्र शासनास सादर केलेले असणे, निवड झालेल्या स्मार्ट शहरांसाठी पाच वर्षांसाठी प्रतिवर्ष/प्रतिशहर केंद्र शासनाने रुपये १०० कोटी तर राज्य शासनाने प्रतिवर्ष/प्रतिशहर रु. ५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करावयाचे असणे, मात्र राज्यातील काही शहरांची दिड वर्षापूर्वीपासून व तद्नंतर निवड झालेली असताना व रितसर प्रस्ताव सादर झालेला असताना अद्यापही निधीची उपलब्धता करण्यात आलेली नसणे, तसेच प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कोणतेही विशिष्ट अशी कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे सदर प्रकल्प राबविण्याकडे शासनाची दिसून येत असलेली उदासिनता, सदर महत्वकांक्षी व इतर नागरीकांच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे असलेले प्रकल्प तातडीने राबविण्यासाठी प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्याचा नियमित आढावा घेण्याची नितांत आवश्यकता या बाबी विचारात घेण्यासाठी शासनस्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| ३०. | **श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५७** |
| | “राज्यात व विशेषत: पुणे शहरातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत चाललेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन या वस्तूंचे बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेले आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करुन जीवनावश्यक वस्तूंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| ३१. | **श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५८** |
| | “राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालय नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्र सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळतील, म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी.अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक आपतकालीन उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |
| ३२. | **श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५९** |
| | “पावसाची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भिषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी सुध्दा होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झाली असणे, त्यावर जलतज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळे उपाययोजना करण्याची आवश्यकता, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतू याबद्दलची अंमलबजावणी होत नसणे, महाराष्ट्रातील सर्व शासकिय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रिकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता असणे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासनाने कठोर निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात तसेच (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारती वरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजनाबाबत केलेली तरतूद तपासूनच बांधकाम परवाना द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” |

| | |
|---|---|
| **३३.** | **श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १६०** |
| | "राज्यात सक्तीच्या व मोफत शिक्षण कायद्यामुळे राज्यातील मुलांच्या व मुलींच्या शिक्षण घेण्यामध्ये वाढ होणे, परिणामी राज्यातील साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली असणे, प्रत्येक गावात माध्यमिक शिक्षणाची सोय निर्माण होणे, माध्यमिक शिक्षणानंतर काही खेड्यात पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळे पालक मुलींना पुढील शिक्षण घेण्यासाठी बाहेर गावी पाठविण्यास इच्छुक नसणे, परिणामस्वरूप मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहणे, राज्यातील बहुतेक गावात उच्च माध्यमिक शिक्षण उपलब्ध होत असणे, तरी या माध्यमिक शाळांना जोडून विना शर्त उच्च माध्यमिकचे सर्व शाखांचे वर्ग उपलब्ध करून देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |

**विधान भवन,**
**नागपूर**
**दिनांक : ११ डिसेंबर, २०१७.**

**डॉ.अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**प्रति :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव, तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, शिबीर कार्यालय, नागपूर.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष **(Website)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**